# विलगीकरण केंद्रासाठी अदाणींकडून मदत; अल्पावधीत विजेच्या जोडण्या पूर्ण

मुंबई : कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी मोठ्या संख्येने विलगीकरण केंद्रे उभारण्याची गरज आहे. अदाणी इलेक्ट्रिसिटी कंपनीने त्यासाठी तातडीने मदत केली. वर्सोवा येथील नव्या, पण वापरात नसलेल्या इमारतींचे रूपांतर विलगीकरण केंद्रात करण्यात आले; तेच मोकळ्या जागांवर तात्पुरती शिबिरे उभारण्यात आली. या सर्व ठिकाणी अल्पावधीत विजेच्या जोडण्या देण्याचे आणि पुरवठा सुरू करण्याचे काम अदाणीचे अभियंते व कर्मचाऱ्यांनी केले. बहुतेक इमारतींमध्ये मुख्य डीपीतून वीज आणणे, तळमजल्यावर केबिन तयार करून प्रत्येक खोलीपर्यंत तारा टाकणे, स्विचबोर्ड बसवणे अशी कामे करावी लागली. आपत्कालीन तत्त्वावर हा वीजपुरवठा करण्यात आल्याचे अदाणी इलेक्ट्रिसिटीच्या प्रवक्त्याने सांगितले. आतापर्यंत सुमारे ३००० सदनिकांना वीज देण्यात आली असून, आणखी ५०० घरांना पुरवठा करण्याचे काम सुरू आहे. ५०० खाटांच्या पाच रुग्णालयांनाही वीजपुरवठा करण्यात आला. वर्सोवा येथे ३००० चौरस फुटांवर होमगार्डने ५०० जणांसाठी निवासी शिबिर उभारले आहे. या शिबिरालाही वीजजोडणी देण्यात आली.